1 7 OCT 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात संशोधन करावे

## डॉ. पी. व्ही. कामत : शिवाजी विद्यापीठात 'ग्यान' कार्यशाळेचा प्रारंभ

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : 'संपूर्ण जगभरात ऊर्जेचे संकट भेडसावत आहे. जगाला स्वच्छ ऊर्जा निर्मितीचे पर्याय शोधण्याची निकड भासत आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी संशोधन करण्याची गरज आहे', अशी अपेक्षा अमेरिकेतील नॉत्रे दॅम विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. पी. व्ही. कामत यांनी आज येथे व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाने 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क' अर्थात 'ग्यान' उपक्रमांतर्गत आयोजिलेल्या पाचदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. या उपक्रमात डॉ. कामत 'अॅडव्हान्स्ड फंक्शनल मटेरियल्स अॅन्ड ग्रीन एनर्जी स्ट्रॅटेजीस्' या विषयाच्या अनुषंगाने व्याख्याने देणार




**कोल्हापूर : 'ग्यान' कार्यशाळेत अमेरिकेतील नॉत्रे दॅम विद्यापीठाचे डॉ. पी. व्ही. कामत यांनी मार्गदर्शन केले.**

आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. कामत म्हणाले, 'नजीकच्या काळात वाढत्या ऊर्जेची गरज भागविण्यासाठी पर्यावरणीयदृष्ट्या आपल्याला स्वच्छ ऊर्जेचे पर्याय शोधावे लागणार आहेत. त्यासाठी पायाभूत सुविधांपासून ते हरित ऊर्जा निर्मितीपर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये नवसंशोधनाची गरज निर्माण झाली आहे. जगभरातील संशोधन या दिशेने केंद्रित झालेले आहे. आपल्या विद्यार्थ्यांनाही येथे संशोधनाची पुरेपूर संधी आहे. ती त्यांनी घेतली पाहिजे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'आजच्या संशोधकांच्या पिढीने शाश्वत विकासासाठी आग्रही राहिले पाहिजे. त्या दृष्टीने नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत शिवाजी विद्यापीठात अभ्यासक, संशोधकांचे अॅकॅडमिक वर्तुळ कार्यरत करण्यात आले आहे.' कार्यशाळेचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनावणे यांनी प्रास्ताविक केले. 'ग्यान' समन्वयक डॉ. केशव राजपुरे यांनी आभार मानले.

### धोरणात्मक बदल आवश्यक

■ डॉ. साळुंखे म्हणाले, 'जागतिक स्तरावर शाश्वत विकासाच्या प्राधान्यक्रमावर स्वच्छ ऊर्जा हा विषय सातव्या स्थानी आहे. जी-२० परिषदेने मानवजातीसमोरील समस्यांचे नव्याने अधोरेखन केले आहे. त्यावर उपाययोजना करण्यासाठी धोरणात्मक बदलांची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने संशोधकांमधील संशोधन विषयांतील दरी संपुष्टात आणून बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय संशोधनास प्रोत्साहन दिले पाहिजे.'

17 OCT 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# स्वच्छ ऊर्जा निर्मिती दिशेने संशोधनाची गरज

## प्रा. पी. व्ही. कामत, शिवाजी विद्यापीठात पाच दिवसीय 'ग्यान' कार्यशाळेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संपूर्ण जगभरात ऊर्जेचे संकट भेडसावत आहे. जगाला स्वच्छ ऊर्जा निर्मितीचे पर्याय शोधण्याची निकड भासत आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी संशोधन करण्याची गरज आहे, अशी अपेक्षा आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ व अमेरिकेतील नॉत्रे दॅम विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. पी. व्ही. कामत यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाने 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकॅडेमिक नेटवर्क' अर्थात 'ग्यान' उपक्रमांतर्गत आयोजिलेल्या पाचदिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन समारंभात ते बोलत




**कार्यशाळेच्या उद्‌घाटन समारंभात बोलताना डॉ. पी. व्ही. कामत.**

होते. या उपक्रमात डॉ. कामत 'ॲडव्हान्स फंक्शनल मटेरियल्स अन्ड ग्रीन एनर्जी स्ट्रॅटेजीस' या विषयाच्या अनुषंगाने व्याख्याने देणार आहेत.

डॉ. कामत म्हणाले, नजीकच्या काळात वाढत्या उर्जेची गरज भागविण्यासाठी पर्यावरणीयदृष्ट्या आपल्याला स्वच्छ ऊर्जेचे पर्याय शोधावे लागणार आहेत. त्यासाठी पायाभूत सुविधांपासून ते हरित ऊर्जा निर्मितीपर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये नवसंशोधनाची गरज निर्माण झाली आहे. जगभरातील संशोधन या दिशेने केंद्रित झालेले आहेत.

डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, जागतिक स्तरावर शाश्वत विकासाच्या प्राधान्यक्रमावर स्वच्छ ऊर्जा हा विषया सातव्या स्थानी आहे. जी-२० परिषदेने मानवजातीसमोरील समस्यांचे नव्याने अधोरेखन केले आहे. त्यावर उपाययोजना करण्यासाठी धोरणात्मक बदलांची आवश्यकता आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, आजच्या संशोधकांच्या पिढीने शाश्वत विकासासाठी आग्रही राहिले पाहिजे. त्या दृष्टीने नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत शिवाजी विद्यापीठात अभ्यासक, संशोधकांचे अकादमिक वर्तुळ कार्यरत केले आहे. त्याचा विस्तार करत विद्यार्थ्यांचाही त्यात समावेश करण्याचा मानस आहे.

कार्यशाळेचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनावणे यांनी प्रास्ताविक केले, तर विद्यापीठाचे 'ग्यान' समन्वयक डॉ. केशव राजपुरे यांनी आभार मानले.

तरूण भारत



# विद्यापीठ नियमावलीचे पुस्तक उपलब्ध

**कोल्हापूर :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम–२०१६ नुसार तयार करण्यात आलेल्या सर्व परिनियमांची एकत्रित पुस्तिका विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दर्शनी भागात गर्व्हनन्स या लिंकअंतर्गत ठेवण्यात आलेली आहे. तसेच विद्यापीठ कायदे, सार्वसाधारण परिनियम विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

शिवाजी विद्यापीठ अभ्यासक्रमांतर्गत नियमावली अभ्यासक्रमांचा भाग असल्याने त्यात वेळोवेळी बदल होतो. त्यांचा समावेश सुरूवातीपासून अभ्यासक्रमात केला जातो. तसेच सामान्य प्रशासन, महाविद्यालयीन कामकाज, परीक्षा आणि वित्तविषय वारंवार संदर्भासाठी वापरण्यात येणाऱ्या तरतुदी तसेच लेखासंहिता यांच्या स्वतंत्र पुस्तिका संबंधित विभांतर्गत तयार करून वापरल्या जातात. मागणीनुसार त्या उपलब्ध करून दिल्या जातात. विद्यापीठाच्या कँटीनमध्ये मान्यता दिलेल्या पदार्थांखेरीज अन्य पदार्थ विक्रीसाठी ठेवल्यास कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने प्रसिध्द करण्यात आली आहे.

सकाळ

# ज्ञानशाखांमधील भिंती पाडण्याची गरज : डॉ. बी. एम. हिर्डेकर

कोल्हापूर : पर्याप्त विषय आणि अन्य विषयांचे किमान ज्ञान देणारे वाचन असले की, त्यातून नव्या गोष्टी समजण्याबरोबरच कृतिशीलतेच्या प्रेरणाही मिळतात. आजच्या काळात विविध ज्ञानशाखांमधील भिंती पाडण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'का वाचावे? आणि काय वाचावे?' या विषयावर डॉ. हिर्डेकर यांचे विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. ते म्हणाले, "विद्यापीठाच्या ग्रंथालयात अनेक दुर्मिळ पुस्तकांचा खजिना वाचकांच्या प्रतीक्षेत आहे. त्याचप्रमाणे दर वर्षी लाखो रुपयांची पुस्तके खरेदी केली जातात, त्यांचा लाभही विद्यार्थ्यांनी घेण्याची गरज आहे." या वेळी गौरी चिंचणे, आकाश कांबळे, शिवाजी चव्हाण या विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांतील उताऱ्यांचे अभिवाचन केले. ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील उपस्थित होते. ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत केले. डॉ. प्रकाश बिलावर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुधाराणी हजारे आणि प्रियांका मुजुमदार-भिडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. वाय. जी. जाधव यांनी आभार मानले.

लोकमत

# कमकुवत महाविद्यालयांना मिळणार आर्थिक 'बळ'

## व्यवस्थापन परिषद : विद्यापीठात समितीची स्थापना

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय गुणवत्ता अभियान, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महाविद्यालयांना आर्थिक मदत देण्याबाबतच्या समितींची स्थापना करण्यात आली. व्यवस्थापन परिषदेची सोमवारी बैठक झाली. यात हा निर्णय झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

या बैठकीत परिनियम समितीचीही स्थापना करण्यात आली असून, या समितीच्या अध्यक्षपदी डॉ. रघुनाथ ढमकले यांची निवड केली. बैठकीच्या अजेंड्यावर ६० विषयांवर व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतले. सातारा व सांगली येथे होणाऱ्या विद्यापीठाच्या उपकेंद्र निर्मितीसाठी दोन समित्यांची स्थापना केली. सध्या विद्यापीठातील पाळणाघरात १ ते ६ वर्षांपर्यंतची मुले ठेवली जातात. येथून पुढे बारा वर्षांपर्यंतच्या मुलांना पाळणाघरात ठेवण्याबाबतचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशबाबत पात्रतेसाठीचे शुल्क, अन्य विद्यापीठाच्या एम.फील. व पीएच.डी. पदवीसाठी समकक्षतेच्या फीबाबत निर्णय घेण्यात आला.

पुढारी

# सातारा, सांगली उपकेंद्र निर्मितीसाठी दोन समित्या गठित

## व्यवस्थापन परिषदेमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सातारा व सांगली याठिकाणी उपकेंद्र निर्मितीसाठी दोन समित्या गठित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सोमवारी (दि. १६) झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सुरुवातीला नूतन व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. आर. व्ही. गुरव यांचे स्वागत करण्यात आले. नूतन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचेही अभिनंदन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठामध्ये झालेल्या विविध बैठका, चर्चासत्रे व कार्यशाळा यांचा आढावा घेतला. ६० विषयांच्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतले. शाहू संशोधन केंद्रामार्फत प्रकाशित होणाऱ्या 'कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक खंड' या ग्रंथाच्या किंमत आणि विद्यापीठातील पाळणा घराबाबत निर्णय घेण्यात आला.



विद्यापीठामध्ये परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत पात्रतेसाठीचे शुल्क, अन्य विद्यापीठांच्या एम. फिल. व पीएच.डी. पदवीसाठी समकक्षतेची फीबाबतचा निर्णय झाला. रसायनशास्त्र व भूगोल विभागाच्या मार्फत होणाऱ्या वेगवेगळ्या कोर्सेससाठी मान्यता देण्यात आली. प्रशासकीय गुणवत्ता अभियान यासाठी समित्यांचे गठन करण्यात आले. 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' या शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास ग्रंथास मान्यता देण्यात आली. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महाविद्यालयांना आर्थिक मदत देण्याबाबतच्या समितीचे गठन करून परिनियम समितीचेदेखील गठन करण्यात आले. समितीच्या अध्यक्षपदी डॉ. रघुनाथ ढमकले यांची निवड केली. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्राचार्य डॉ. आर. ए. शेजवळ, स्वागत परुळेकर, अमरसिंह रजपूत यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

सकाळ

# सातारा, सांगलीच्या उपकेंद्रासाठी समिती गठीत

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : सातारा, सांगली जिल्ह्यात शिवाजी विद्यापीठाची उपकेंद्रे सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. या केंद्रांमध्ये कोणते अभ्यासक्रम सुरू करावयाचे याबाबतची पाहणी करण्यासाठी आज विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत दोन समित्या गठीत करण्यात आल्या. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महाविद्यालयांना मदत करण्यासाठी परिनियम समिती देखील गठीत करण्यात आली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. व्यवस्थापन परिषदेचे नूतन सदस्य डॉ. जगदीश सपकाळे, वर्षा मैंदर्गी, आर. व्ही. गुरव यांचे स्वागत करण्यात आले. विद्यापीठात २३ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर दरम्यान झालेल्या विविध उपक्रमांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी आढावा घेतला. त्यानंतर विविध ६० विषयांवर या बैठकीत चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

राजर्षी छत्रपती शाहू संशोधन केंद्रातर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या 'कोल्हापूर ऐतिहासिक व प्राकृतिक खंड' या ग्रंथाची किंमत ठरविण्यात आली. विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या ६ ते १२ वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी पाळणाघर उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. रसायनशास्त्र आणि भूगोल अधिविभागाच्या विविध अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली. 'हिरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' या ग्रंथास मान्यता देवून त्याचे प्रकाशन लवकर करण्याचे ठरविण्यात आले. आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांसाठीच्या समितीच्या अध्यक्षपदी डॉ. रघुनाथ ढमकले यांची निवड करण्यात आली. अन्वेषण संशोधन महोत्सवाच्या आयोजनास मान्यता देण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, राजेंद्र शेजवळ, स्वागत परुळेकर, अमरसिंह रजपूत उपस्थित होते.

1 7 OCT 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इस्लामपूरच्या पाटील महाविद्यालयाला विजेतेपद

## गडहिंग्लजला शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला कबड्डी स्पर्धा

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथे पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला कबड्डी स्पर्धेत इस्लापूरच्या श्रीमती कुसुमताई पाटील महाविद्यालयाने कोल्हापूरच्या शाहू कॉलेजचा ४४ विरुद्ध २४ असा पराभव करून विजेतेपद पटाकावले. कुरुकलीच्या भोगावती महाविद्यालयाने तृतीय, तर कराडच्या एसजीएम महाविद्यालयाने चतुर्थ क्रमांक मिळवला. विद्यापीठ क्रीडा विभागातर्फे मॅटवर कबड्डी झाली. येथील ओंकार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाने स्पर्धेचे संयोजन केले.



**गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला कबड्डी स्पर्धेतील विजेत्या इस्लामपूरच्या संघाला पारितोषिक देताना अण्णा गावडे, डॉ. संजय पाटील, डॉ. लीना पाटील, विद्या पाटील आदी.**

प्रारंभी विद्यार्थी विकास कक्षाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून स्पर्धेचे उद्घाटन झाले. रवींद्र कारेकर, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण, निवड समिती अध्यक्ष डॉ. संजय पाटील, डॉ. बाबासाहेब उलपे यांची उपस्थिती होती. स्पर्धेत उत्कृष्ट चढाई पटू गायत्री डोंगळे (भोगावती महाविद्यालय), उत्कृष्ट पकड शिवरजनी पाटील (के. आर. कन्या, इस्लामपूर) तर उत्कृष्ट खेळाडू म्हणून ऋतुजा अवघडे (शाहू कॉलेज कोल्हापूर) यांचा गौरव करण्यात आला. दरम्यान, या स्पर्धेतून निवड समितीतर्फे शिवाजी विद्यापीठाच्या कबड्डी संघाची निवड करण्यात आली. स्पर्धा यशस्वितेसाठी जिल्हा कबड्डी संघटनेचे सहकार्य लाभले.

अण्णा गावडे, डॉ. संजय पाटील, डॉ. लीना पाटील, विद्या पाटील, आर. टी. पाटील आणि विक्रम यमगेकर यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. ओंकारचे संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर यांचे सहकार्य लाभले. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी सूत्रसंचालन केले. सुरेश धुरे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# युवा महोत्सवात 'विवेकानंद' अव्वल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दहिवडी, जि. सातारा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने विविध १५ कला प्रकारात पुरस्कार प्राप्त करून शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवात अव्वल येण्याचा बहुमान पटकावला. यामध्ये अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप, फिरता चषक, संगीत विभाग फिरता गौरव चषक, नाट्य विभाग फिरता गौरव चषक मिळवण्याचा बहुमानही पटकावला.

या युवा महोत्सवात शास्त्रीय नृत्य (प्रथम), एकपात्री अभिनय (तृतीय), पाश्चिमात्य एकल गायन (प्रथम), शास्त्रीय सूरवाद्य (तृतीय), पाश्चिमात्य एकल वादन (द्वितीय), स्थळ छायाचित्रण (प्रथम), व्यंगचित्र (तृतीय), हिंदी वक्तृत्व (द्वितीय), लोककला व एकांकिका (तृतीय), सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय एकांकिका, लघुनाटिका, पथनाट्य, भारतीय समूहगीत, लोकसंगीत वाद्यवृंद या प्रकारात प्रथम, प्रश्नमंजूषा (द्वितीय). या कलाप्रकारात पारितोषिके प्राप्त झाली. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सांस्कृतिक विभागातील या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात, डॉ. वर्षा पवार, डॉ. राजश्री पाटील, प्रा. एस. एस. कदम, प्रा. संदीप पाटील, प्रा. सतीश उपळावीकर, संगीत शिक्षक महेश हिरेमठ, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

1 7 OCT 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात दसरा चौकात राज्य पर्यटन विभाग व जिल्हा नियोजन समितीच्यावतीने आयोजित शाही दसरा कोल्हापूरचा कार्यक्रमात इचलकरंजीच्या व्यंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आसामचा बिहू नृत्याविष्कार सादर केला. (छाया : आदित्य वेल्हाळ)

# बहुसांस्कृतिक नृत्याविष्काराने रंगत

## दसरा महोत्सव : बिहू नृत्याने कार्यक्रमाची उंची वाढवली

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'गोंधळाला ये भवानी माते तू गोंधळाला ये' जोडीला तामिळनाडू, कर्नाटकातील तालवाद्यांचा कर्णमधुर ताल, वाघ्या-मुरळी नृत्य, आसामचे बिहू नृत्य, जोगवा, दिवली नृत्य आणि अखेरीस स्त्रीशक्ती नृत्य अशा एक ना अनेक बहुसांस्कृतिक कार्यक्रमांचा खजिना रसिकांना 'याचि देही याचि डोळा' सोमवारी अनुभवला. निमित्त होते शाही दसऱ्याचे. कोल्हापूर महोत्सवानिमित्त पर्यटन विभाग, राज्य आणि जिल्हा नियोजन समितीच्यावतीने दसरा चौकात याचे आयोजन केले आहे.

या रंगारंग कार्यक्रमाची सुरुवात पुण्याच्या संतोषकुमार मोरे यांच्या 'गोंधळाला ये भवानी माता तू गोंधळाला ये' या गाण्याने झाली. मध्यवर्ती युवा महोत्सावातील विजेत्या कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केरळा नटनम नृत्य आणि कर्नाटक, तामिळनाडूतील प्रसिद्ध तालवाद्यांचे सादरीकरण केले. यात चेंडा, कोड्डू, मृदगंम, तासे, मोडा, उडकई, ईडकई, मुसासू, थीमवल, पराई या कर्णमधुर तालांना रसिकांनी तर अखंडपणे टाळ्यांची दाद दिली.

इचलंकरजीच्या व्यंकटेश महाविद्यालयाने सादर केलेल्या आसामच्या पारंपरिक वेशभूषेतील बिहू नृत्याने तर कार्यक्रमाची उंची वाढवली. न्यू कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी महाराष्ट्राचे वाघ्या-मुरळी नृत्य सादर करीत रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. त्यानंतर देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटकचे कमसाले, तर इस्लामपूरच्या यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालयाने रायबेंशे नृत्य सादर केले. इचलकरंजीच्या अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाने सादर केलेल्या जोगवा नृत्याने उपस्थितांना ठेका धरायला लावला. उत्तरोत्तर रंगलेल्या या कार्यक्रमात शिराळ्याच्या विश्वासराव नाईक महाविद्यालयाने गोव्यातील प्रसिद्ध दिवली नृत्य सादर केले. कार्यक्रमाची सांगता विद्यापीठाच्या सांस्कृतिक संघाने सादर केलेल्या कोल्हापूर रणरागिणीवर आधारित स्त्री शक्ती नृत्याने अखेर साज चढविला. यावेळी विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, न्यू कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील उपस्थित होते.

17 OCT 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाद्ये घुमली अन् रसिकांनी धरला ताल

## शाही दसरा महोत्सव : दसरा चौकात रंगला कलाविष्कार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश या दक्षिणेतील राज्यांमधील ताल वाद्ये घुमू लागली अन् उपस्थित रसिकांनी टाळ्यांचा ताल धरला. चेंडा, कोट्टू, मृदगंदम्, तासे, मोडा, उडकई, ईडकई, मुसासू, थविल अन् पराई वाद्यांनी अक्षरशः कमाल केली. रसिकांनी तालावर डोलवलं. धुसर रात्र अन् या तालवाद्यांच्या नादमयतेने प्रत्यक्ष पावसाची हलकीशी सर पटांगणातील मातीवर अवतरली.

पर्यटन विभाग आणि जिल्हा नियोजन समितीने 'शाही दसरा कोल्हापूर'चा महोत्सवांतर्गत नवदुर्गा लोकनृत्योत्सवाचे सादरीकरण दसरा चौकातील पटांगणावर केले. शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवातील गुणी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी महाराष्ट्राची अन् देशातील विविध राज्यातील लोककला, लोकनृत्य सादर करत कलाविष्कार घडविला.



कोल्हापूर : व्यंकटेश महाविद्यालयाने सादर केलेले आसामचे बिहू नृत्य. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

प्रथम गुरुवंदनेने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. विवेकानंद महाविद्यालयातील लोकवाद्यवृंद समुहाने तालीम वाद्यांच्या माध्यमातून तालाचं दर्शन घडविलं. टाळ्यांच्या कडकडाट होत असतानाच इचलकरंजीतील व्यंकटेश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आसामचं बिहू नृत्यात रंगत आणली. आसाममधील आदीवासी बांधवांचं गाणं, नृत्यांनी कमाल केली. मग मंदिरातील विविध धार्मिक कार्यक्रमात वाजविण्यात येणारं अन् त्यातील भावमुद्रांचा समावेश असलेलं केरळा नटनम नृत्य हे विवेकानंद महाविद्यालयातील मुलांनी सादर केलं. यानंतर यळकोट यळकोट जय मल्हार, सदानंदाचा यळकोट म्हणत न्यू कॉलेजच्या मुलांनी वाघ्यामुरळीच्या माध्यमातून खंडोबाचा उभा जागर उभा केला. कॉमर्स कॉलेजच्या कर्नाटकातील कमसाले नृत्य, इचलकरंजीतील श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयानं जोगवा नृत्य, शिराळा येथील विश्वासराव नाईक कला वाणिज्य महाविद्यालयानं गोव्याचं दिवली नृत्य, शिवाजी विद्यापीठ सांस्कृतिक संघाने स्त्रीशक्ती नृत्यांनी कार्यक्रमात जान आणली.


17 OCT 2023 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नृत्य, फोक नाट्यातून देशाच्या संस्कृतीचे दर्शन

- रसिकांनी दिली टाळ्यांच्या गजरात दाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शाही दसरा महोत्सवात पारंपरिक वेशभूषा, नवदुर्गा लोकनृत्योत्सव शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवातील विजेत्या विद्यार्थ्यांनी फोक ऑर्केस्ट्रा, विविध लोकगीतांवर लोकनृत्याविष्कार सादर करून रसिकांची मने जिंकली. नृत्याविषकाराला रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. दरम्यान पुणे येथील युवा कला मंच निर्मित संतोष कुमार मोरे यांनी ओळख आपल्या वाद्यांची या कार्यक्रमात सर्वच वाद्यांची ओळख करून देत महत्वही सांगितले.



कोल्हापूर : दसरा महोत्सवात केरळा नटनम नृत्य सादर करताना कलाकार.

सुरूवातील गुरूवंदना सादर केली. त्यानंतर कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी लोकवाद्यवृंद समूहामध्ये देशातील अनेक वाद्यांची धून ऐकवली. त्यानंतर केरळमधील केरळा नटनम नृत्य सादर करून रसिकांची मने जिंकली. इचलकरंजीतील अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जोगवा नृत्य केले. न्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी वाघ्यामुरळी नृत्य सादर करून पारंपरिक नृत्याविष्काराचे दर्शन घडवले. कोल्हापुरातील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटकामधील सुप्रसिध्द कमसाले नृत्य सादर करून तेथील पारंपरेचे दर्शन घडवले. इस्लामपूर येथील यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पश्चिम बंगालमधील पारंपारिक रायबेंशे नृत्य सादर केले. इचलकरंजीतील व्यंकटेश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आसामधील प्रसिध्द बिहू नृत्य सादर केले. शिराळा येथील विश्वासराव नाईक कला वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गोव्यातील दिवाली नृत्य सादर केले. शिवाजी विद्यापीठ सांस्कृतिक संघाने कोल्हापूर रणरागीणींवर आधारीत स्त्रीशक्ती नृत्य सादर करून देवींचे दर्शन घडवले. यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. व्ही. एन. पाटील, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संग्राम भालकर, अभिनेता आनंद काळे उपस्थित होते.

लोकमत

व्याख्यान : शिवाजी विद्यापीठात किशोर बेडकिहाळ यांचे व्याख्यान, स्थळ शिवाजी विद्यापीठ, वेळ : १०.३० वाजता.